# माझी गादी

शनिवारी रात्री घरातल्या सगळ्यांनी ठरवलं,‘आता भराभरा जेवायचं आणि मस्त सिनेमला जायचं. आणि जाताना गाद्या घालून जायचं, म्हणजे मग रात्री घरी आलं की चपला काढायच्या आणि गादीवर उड्या मारायच्या.’

सगळेजण भराभरा जेवले. मग भराभर कामाला लागले आणि सिनेमाला पळाले. थंडीचे दिवस होते, म्हणून जाताना स्वेटर-बिटर घालून गेले.

आता घरात कुणी नाही याचा अंदाज घरातल्या काही जणांना लागला.

जमिनीवर उताण्या पडलेल्या गाद्या, त्यांच्या डोक्यावर बसलेल्या उशा आणि त्यांच्या पायावर पडलेली पांघरुणं आपापसात गप्पा मारु लागली.

***गादी :*** या घरातल्या माणसांचा सिनेमा म्हणजे आपला तमाशा होतो हो!

***उशी :*** आँ? ते कसं काय बाई?

***गादी :*** आता आम्ही निवांत कॉटवर पडून होतो. इतक्यात त्या सिनेमाचं खूळ निघालं. झालं! त्यांनी मला कसंतरी उचललं आणि जमिनीवर आपटलं. पडताना पाय दुमडला, मान मुडपली तर त्या बाबांनी लाथेनेच मला सरळ केलं.

***पांघरूण :*** याला म्हणतात सिनेमाची नशा!

***गादी :*** म्हणजे?

***पांघरूण :*** अगं ही माणसं त्या सिनेमात पाहतात मारामारी. पण तशी त्यांना बाहेर करता येत नाही. कारण त्यांना माहित आहे , मारामारी करायला गेलं तर त्यांचंच थोबाड फुटेल!
म्हणून मग तुलाच जमिनीवर फेकतात आणि मारामारीच्या मोठ्या स्टाइलने तुला लाथा हाणतात.

***उशी :*** आणखी काय असतं हो त्या सिनेमात?

***गादी :*** मरू दे तो सिनेमा. या थंड फरशीवर उताणं पडलं की अंग धरतं माझं. पार गारठून जायला होतं. माझ्या कापूस-गाठी अगदी बधिर होतात.

***पांघरूण :*** कमालच आहे! एव्हढी जाडजूड तू पण तुझ्याकडे जरा म्हणून सहनशक्ती नाही.
अगं रात्रभर आम्ही तुला झाकतो. त्या पंख्याचा भणभणता गार वारा आम्ही स्वतः खातो पण त्याबद्दल तुला कधीतरी बोलतो?
आम्ही बकबक न करता निमूटपणे सहन करतो.

***गादी :*** धन्यवाद पांधरूणराव, धन्यवाद!
आता तुम्ही सहनशक्तीचं बोललात म्हणून तुम्हाला एक सांगते, उन्हाळ्याच्या दिवसात सकाळी मला गच्चीवर नेतात. मग दिवसभर मला कडक उन्हात ठेवतात. दोन्ही बाजूंनी मला तापवतात तेव्हा चांगले चरचरीत चटके बसतात मला. आणि हे कमी की काय म्हणून, मग संध्याकाळी मला

काठीने बडव-बडव बडवतात!!
पण त्यावेळी मी हूं का चूं करत नाही म्हंटलं.
खोळ दाबून काठीचा मार सहन करते.

*उशी :* अं.. तसं मी मधे बोलणं म्हणजे,..'उगाचच कापूस पिंजल्या सारखं आहे..'

*गादी :* बोल ग. इतकं काय सुक्या कापसासारखं भुरभूरतेस?

*उशी :* तो सिनेमा आणि त्या सिनेमातल्या मारामाऱ्या परवडल्या पण..
ते डब्लू डब्लू एफ नको ग बाई!

*गादी :* आता हे काय नवीनच?

*उशी :* अहो गादीबाई तुम्हाला काही माहित नाही.
डब्लू डब्लू एफ म्हणजे नुसती मारामारी नाही तर चक्क हाणामारी!

*पांघरूण :* हाणामारी म्हणजे दोघांनी एकमेकांना हाणायचं, मारायचं, आपटायचं, धोपटायचं, उचलायचं, फेकायचं, बुकलायचं, लाथाडायचं...

*गादी :* बास! बास!! आता माझ्या कानात कापसाचे दडे बसले आहेत.
हे असलं करणाऱ्यांना माणूस म्हणायचं की राक्षस? हेच मला कळत नाहीए.
पण मला सांगा उशीताई, तुमचा त्या डब्लू डब्लू एफ शी काय संबंध.

*पांघरूण :* अहो दिवसभर तुम्ही घरात असलात तरी या घरात काय चाललंय याचा तुम्हाला थांगपत्ता नसतो...कारण...
ही माणसं दिवसभर तुम्हाला झाकून ठेवतात.
रंगीबेरंगी जाड बेडशीटमधे तुम्हाला गुंडाळून ठेवतात.

*गादी :* ऊं.. .. खरंय तुमचं!

*उशी :* अहो टीव्हीवरच्या कुठल्यातरी चॅनेलवर लागतो हा डब्लू डब्लू चा रानटी प्रकार.
नेहमी माझ्याशी प्रेमाने वागणारी, मला डोक्याशी घेणारी ही मुलं टीव्हीवर ते डब्लू सुरु झालं की बिथरतात. मग त्या मुलांच्या अंगात ते डब्लूचं भूत संचारतं.
ती मला हवेत ऊंच उडवतात आणि मी खाली पडण्याआधीच मला लाथाडतात.
मला पायाखाली चेचतात. हातात धरून बुकलतात. माझे हालहाल करतात.
माझा कापूस आतल्या आत पिंजून निघतो. माझ्या गाठी खिळखीळ्या होतात.
काय करणार?
आता वय झालं. कापसाचा साका झाला, खोळ ढिली पडली.

*पांघरूण :* तरीपण तुम्ही भाग्यवानच म्हणायचं!
अहो तो राजेश...

*गादी :* कोण हो?

*उशी :* तो छोटा मुलगा..?

*पांघरूण :* हो..हो तोच तो.. पाच वर्षाचा घोडा!
अहो एव्हढा पाच वर्षाचा झाला तरी त्याने मागच्या आठवड्यात माझ्या अंगावर

रात्री आठवेळा सू-सू केली! आठ वेळा!!

*उशी :* अहो पांघरुणराव, तुमचं गणित कच्चं दिसतंय.
आठवड्यात एकूण सातच रात्री असतात म्हंटलं..

*पांघरूण :* .. तोंडात कापूस आहे म्हणून वाटेल ते बडबडू नकोस.
एका रात्री त्या घोड्याने दोनदा सू सू केली हे तुला माहित आहे का?
विश्वास बसत नसेल तर विचार गादीबाईंना.
काय ग.. 'माझं अंग सू सु मधे भिजतं तेव्हा तुला गणित सूचतं?

*गादी :* रागावू नका पांघरुणराव.
अगं उशे राव काही खोटं बोलत नाहीत.
तू असतेस डोक्याखाली आणि आम्ही असतो अंगाखाली.. .. कळलं?

*पांघरूण :* त्यावेळी मला रोज सकाळी गरम गरम पाण्यात बुचकळायचे. त्याचवेळी त्या पाण्यात विचित्र वासाचं चमचाभर औषध टाकायचे. त्या सू सू च्या आणि त्या औषधाच्या एकत्रित वासाने तर मळमळायला लागायचं. माझ्या सुंदर डिझाइनचा रंग सुध्दा फिका पडायचा.
मग ते मला मशिनमधे गरागरा फिरवायचे. ड्रायरमधे घुमवायचे. नंतर दोरीवर उलटं टांगायचे.
दिवसभराच्या शिक्षेनंतर मी सुकायचो.
मग पुन्हा गादीवर पडून थोडा आराम करावा, तर हा घोडा मुतून, मला पुन्हा भिजवायचा.
त्यामुळे रात्रभर सू सू मधे भिजून कुडकुडायचं आणी मग दिवसभर दोरीवर उलटं लोंबकळायचं!
खरं सांगतो, त्या आठवड्यात माझं बॉर्डरवरचं डिझाइन सुध्दा उलटं-सुलटं झालं!!

*गादी :* तरी मी म्हणेन, माझ्यापेक्षा तुमचं बरं आहे. माझं मेलीचं कापडच फाटकं!
अरे माझ्यावर चहाचे, सरबताचे, कॉफीचे, औषधाचे, तेलाचे, हळदीचे,आमटीचे आणि त्या घोड्याच्या मुताचे सुध्दा इतके डाग पडले आहेत की.. .. .. ..

*पांघरूण :* की.. .. भूगोल शिकविण्यासाठी ॲटलासची गरजच नाही!
जगातल्या सगळ्या देशांचे आणि त्या देशातल्या सगळ्या राज्यांचे नकाशे इथे आहेतच!!

*उशी :* आणि आकाशातल्या ग्रह ताऱ्यांची आकाशगंगा माझ्याकडे आहे.

*गादी :* काय म्हणतेस काय? खरं की काय?

*उशी :* अहो मी कशाला खोटं बोलू?
या घरातल्या त्या अक्काबाई, रात्री डोक्यावर पचापचा तेल थापतात आणि तशाच झोपतात! त्यांचं ते चिकट सुगंधी रंगीत तेल रात्रभर माझ्यावर थेंब-थेंब पाझरत असतं. त्या तेलकट वासाने मला अगदी गुदमरायला होतं.
तो अरुण अभ्यास करताना मला मांडीवर घेतो. माझ्यावर पुस्तकं ठेवतो. मला

पेन्सिली टोचतो. शाई पुसतो.
आता तर जेवतानासुध्दा मला तो मांडीवर घेतो. माझ्यावर ताट ठेवतो. म्हणजे त्याने जेवायचं आणि आम्ही भाजून निघायचं.
जेवताना माझ्यावर भाजीचा रस्सा, आमटी ,लोणचं सांडवतो.
कधी कधी तो आपले उष्टे हात, हळूच माझ्या अंगाला पुसतो. तेव्हा तर अस्सा राग येतो .. .. पण करणार काय? कापूस गिळून गप्प बसते!

*गादी :* पण एक लक्षात ठेवा, ही माणसं कशीही असली तरी ती आपल्यावर प्रेम करतात. आपल्याला मायेने सांभाळतात.
तुमच्या आधीपासून खूप वर्ष मी या घरात आहे. आता माझं वय झालंय. मी आता पहिल्यासारखी गुबगुबीत राहिले नाही.फार काही मऊ पण नाही. माझ्यावर खूप डाग पडलेत. कापसाच्या गुठळ्या झाल्यात आणि गाठी सुटल्यात.
माझी खोळ पण आता विरत चालली आहे.
पण.. पण.. तरीसुध्दा तो राजेश म्हणतो,“ही माझी गादी आहे. मला नको दुसरी गादी. मी हिच्यावरच झोपणार. माझ्या लाडक्या गादीवर!”
तेव्हा मला खूप बरं वाटतं. आनंद होतो. गाठी घट्ट होतात!
आपण असे म्हातारे झाल्यानंतर, इतरांसाठी नावडते झाल्यानंतरसुध्दा आपण घरातल्या लहानात लहान मुलाचे ‘आवडते’ आहोत, याचा आनंद.. .. कितीही कापूस पिंजला तरी सांगता येणार नाही.

- राजीव तांबे.
rajcopper@gmail.com